# परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय - मुंबई

**प्रथम सत्रांत परीक्षा 2023-24**

**इयत्ता: 7 वी** **विषय - मराठी (द्वितीय भाषा)** **दिनांक: / /2023**

**गुण :80** **वेळ : 3 तास**

---

**प्र.1 अ) खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा.** **(5)**

भारत हा खेडयांचा देश आहे. खेडे म्हणजे गाव. माझे घरही खेडेगावात आहे. माझा गाव समुद्रकिनाऱ्यावर वसला आहे. माझ्या गावाचे नाव 'माणगाव' आहे. माझ्या गावात तीन तलाव आहेत. गावाची लोक वस्ती अंदाजे दोन ते तीन हजार घरांची आहे. गावातील माणसे शेती व मासेमारी करतात. गावात एक आरोग्यकेंद्र, दवाखाना व एक प्राथमिक शाळा आहे. गावाची एक देवी आहे. तिला 'गावदेवी' म्हणतात. वर्षातून एकदा गावदेवीची जत्रा भरते. गावचा बाजार मंगळवारी भरतो. माणगावची नारळाची चिक्की व कोकम प्रसिध्द आहे. आता गावात हळूहळू सर्व सुखसोई झाल्या आहेत. माझा गाव मला फार आवडतो.

**प्रश्न**

1 लेखकाच्या गावाचे नाव काय आहे?

1) रत्नागिरी 2) माणगाव 3) कोल्हापूर

2 गावाची लोकवस्ती अंदाजे किती आहे?

1) सहा ते सात हजार 2) दोन ते तीन हजार 3) चार ते पाच हजार

3 गावचा बाजार केंव्हा भरतो?

1) मंगळवारी 2) बुधवारी 3) शनिवारी

4 लेखकाच्या गावात किती तलाव आहेत?

1) तीन 2) दोन 3) चार

5 गावातील लोक कोणता व्यवसाय करतात?

1)शेती व दुग्धव्यवसाय 2) शेती व सुतारकाम 3) शेती व मासेमारी

**ब) पुढील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (5)**

जून महिन्यात पावसाळ्यात सुरुवात होते. आकाशात काळे ढग जमू लागतात, वारे वाहू लागतात. विजा चमकतात. पाऊस पडू लागतो. पावसामुळे धरती हिरवीगार दिसू लागते. नद्या, तलाव, विहिरी पाण्याने भरतात. शेतकऱ्यांना खूप आनंद होतो. पावसाची चाहूल लागताच मोर नाचू लागतो. पाऊस पडला नाही तर दुष्काळ पडेल.

पावसामुळे आपल्याला पाणी मिळते. पावसामुळे शेती पिकते. वातावरणात गारवा येतो. श्रावण महिन्यात तर सर्वत्र उत्साह भरलेला असतो. पाऊस पडला नाही तर काय होईल याची कल्पनाच करता येत नाही. असा हा पावसाळा मला खूप आवडतो.

**प्रश्न**

1 कोणत्या महिन्यात पावसाला सुरुवात होते?

1) जुलै 2) जून 3) ऑगस्ट

2 पावसामुळे धरती कशी दिसू लागते?

1) हिरवीगार 2) निळीशार 3) लालभडक

3 कोणत्या महिन्यात सर्वत्र उत्साह भरलेला असतो?

1) भाद्रपद 2) आषाढ 3) श्रावण

4 पावसाची चाहूल लागताच कोण नाचू लागतो?

1) चिमणी 2) मोर 3) कावळा

5 पावसामुळे कोणाला खूप आनंद होतो?

1) शेतकऱ्यांना 2) स्त्रियांना 3) पुरुषांना

**प्र.2 अ) सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 5) (5)**

1. बाबांनी मला नवीन सायकल आणली. (नाम ओळखा)

   1) सायकल 2) नवीन 3) आणली

2. त्याने आईला पुस्तक दिले. (सर्वनाम ओळखा)

   1) आई 2) पुस्तक 3) त्याने

3. रंगीबेरंगी फुलपाखरे झाडावर बसतात. (विशेषणओळखा)

   1) फुलपाखरे 2) झाडावर 3) रंगीबेरंगी

4. खिडकीवर कावळा बसला आहे. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

   1) कावळा 2) वर 3) आहे

5. रमेश मैदानात खोखो खेळतो. (क्रियापद ओळखा)

   1) रमेश 2) खोखो 3) खेळतो

6. झाडाला फुले व फळे आली होती. (उभयान्वयी अव्यय ओळखा)
   1) फुले 2) फळे 3) व
7. कासव हळूहळू चालत होता. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)
   1) चालत 2) कासव 3) हळूहळू
8. हे देवा! त्यांना चांगली बुध्दी दे. (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)
   1) त्यांना 2) हे देवा! 3) चांगली

**ब) खालील वाक्यांचे काळ ओळखा. (कोणतेही 4) (4)**

1. आजोबा व आजी पंढरपूरला जातात.
   1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ
2. गुलाबाचे फूल टवटवीत होते.
   1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ
3. पुढच्या आठवड्यात परीक्षा संपेल.
   1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ
4. आम्ही नदीकाठी बसलो.
   1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ
5. मी माझे मन चित्रकलेत रमवेन.
   1) वर्तमानकाळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ

**प्र.3 अ) खालील समानार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 2) (2)**

1. डोंगर
   1) नदी 2) पर्वत 3) तलाव
2. सुपीक
   1) नापीक 2) सुंदर 3) कसदार
3. माया
   1) ममता 2) राग 3) द्वेष

**ब) खालील विरुदधार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 2) (2)**

1. काळा
   1) पांढरा 2) निळा 3) लाल
2. गाव
   1) शहर 2) खेडे 3) ग्राम
3. एक
   1) खूप 2) पुष्कळ 3) अनेक

**क) खालील शब्दांचे लिंग बदला व योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 2) (2)**

1. मासा

   1) माशी 2) मासोळी 3) माश्या

2. महाराज

   1) महाराणी 2) राजा 3) राजन

3. स्त्री

   1) स्त्रिया 2) बाई 3) पुरुष

**ड) खालील शब्दांचे वचन बदला व योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 2) (2)**

1. कारखाना

   1) कारखान्या 2) कारखाने 3) कारखानि

2. बातमी

   1) बातमिया 2) बातमे 3) बातम्या

3. उचकी

   1) उचका 2) उचक्या 3) उचके

**प्र.4 अ) खालील पठित उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (5)**

1896 चा पावसाळा कोरडा गेला. नंतरच्या वर्षीही उन्हाची तल्खली वाढू लागली होती. आभाळात कोरडे ढग जमायचे, निघून जायचे. प्रजेच्या डोळयांतील पाणीसुध्दा आटलं. कोल्हापूरच्या सुपीक मातीला भेगा पडू लागल्या. शेतकरी आभाळाकडं डोळं लावून बसला. महाराष्ट्रभर दुष्काळानं थैमान घातलं. हलकल्लोळ उडाला. जनावरं उपाशी पडली. बळीराजाचं काळीज दगडाचं झालं. गावपंढरी सोडून माणसं जगायला दूर चालली. गोरगरीब करपूर जायला लागले. गावंच्या गावं ओस पडायला लागली.

**प्रश्न.**

1. कोणाचं काळीज दगडाचं झालं?

   1) माणसाचं 2) बळीराजाचं 3) जनावरांचं

2. महाराष्ट्रभर कोणी थैमान घातले?

   1) वादळाने 2) पावसाने 3) दुष्काळाने

3. आभळात ढग कसे जमायचे?

   1)कोरडे 2) ओले 3) पांढरे

4. शेतकरी कोणाकडे डोळं लावून बसला?

   1) आभाळाकडं 2) धरतीकडं 3) वादळाकडं

5. कोल्हापूरच्या सुपीक मातीला काय पडू लागल्या?

   1) फटी 2) भेगा 3) चिरा

**ब) खालील पठित कविता वाचून प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा. (5)**

पुस्तकांत पाखरं चिवचिवतात.
पुस्तकांत आखरं सळसळतात.
पुस्तकांत निर्झर गुणगुणतात
पुस्तकं परीकथा ऐकवतात.
पुस्तकांत रॉकेटचे तंत्र आहे.
पुस्तकात विज्ञानाचा मंत्र आहे.
पुस्तकांची दुनिया न्यारी आहे.
ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे.

**प्रश्न.**

1. पुस्तकांत कोण सळसळतात?

   1) पाखरं 2) आखरं 3) पानं

2. पुस्तकं काय ऐकवतात?

   1) परीकथा 2) साहसकथा 3) विज्ञानकथा

3. पुस्तकात कशाचा मंत्रआहे?

   1) इतिहासाचा 2) भूमितीचा 3) विज्ञानाचा

4. पुस्तकांची दुनिया कशी आहे?

   1) प्यारी 2) न्यारी 3) आगळी

5. पुस्तकांत कोण गुणगुणतात?

   1) निर्झर 2) पक्षी 3) प्राणी

**प्र.5 अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 7) (7)**

1. जंगलात कोणते प्राणी धोक्याची सूचना देतात?
2. कोणाची शेपूट वाकडी असते?
3. जनाई का घाबरुन गेली?
4. पुस्तकात कशाचे तंत्र आहे?
5. गाडीवान व्याकूळ होऊन गाडीभोवती का फिरत होता?
6. पांढऱ्या रंगातून किती रंग निघतात?
7. कोणत्या कलेला वाईट दिवस आले होते?
8. महाराजांनी कोणाची बैठक बोलावली?
9. राणीला कोणत्या आजाराने गांजले होते?

**ब) रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द भरा. (कोणतेही 4) (4)**

1. शाहू महाराजांचा ............. वरखाली व्हायला लागला.
2. जो कुणी ................ बोलणार नाही त्याला शिक्षा करा.
3. जंगली कुत्र्याचा ............. सुबक दिसतो.
4. दुपारची मोट थांबली तशी जनाई ............ फडातून बाहेर आली.
5. साखर कारखान्यामुळे या परिसरात मोठया प्रमाणात ......... पिकवला जातो.
6. पुस्तकं सांगतात ............ युगायुगांच्या
7. रंग जादुचे पेटी मधले ............... असती.

**क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) (6)**

1. शिकार झालेला प्राणी कोणता होता, हे कशावरुन ओळखता येते?
2. शिक्षक विद्यार्थ्यांना घेऊन लगेच घटना स्थळाकडे का निघाले?
3. महाराजांची कोणती आज्ञा अमलात आणणे शक्य नाही, असे तुम्हांला वाटते? असे का वाटते?
4. महाराजांनी रोजगारहमी योजना राबवण्याचे का ठरवले?
5. पुस्तके कोणाकोणाच्या गोष्टी सांगतात, असे कवितेत म्हटले आहे?

**ड) योग्य जोड्या जुळवा. (3)**

| | | |
|---|---|---|
| 1 | राजापूर | विद्यार्थी |
| 2 | कच्चे - पक्के | तरुण |
| 3 | ऊसाची | नजर |
| 4 | शिक्षक | गाव |
| 5 | दोन | रस्ते |
| 6 | भेदरलेली | गाडी |

**प्र.6 अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **(3)**

1 आकाशाला ................................ पाखरे उडती ||1||

2 कुत्र्याची ..................... वेडीवाकडी का?

**ब) कोण, कोणास म्हणाले ? ते लिहा. (कोणतेही 3)** **(3)**

1 "तुमचा तोटा आम्ही दरबारातून भरुन देऊ."

2 "कशी काय आहे राज्याची हालहवाल?"

3 "तुम्ही वांगी आणा छान सुरेख."

4 "दवाखान्याच्या खर्चाचे आम्ही पाहू."

**क) वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही 3)** **(3)**

1) हायसे वाटणे 2) हसून हसून पोट दुखणे 3) साखरे सारखा गोड

4) काळजात धस्स होणे 5) रात्रंदिवस घाम गाळणे

**प्र.7 खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर निबंध लिहा.** **(8)**

1) माझा आवडता समाज सुधारक 2) माझे आवडते पुस्तक

3) शेतकऱ्याचे मनोगत

**प्र.8 खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** **(6)**

1) तुमच्या मित्राला किंवा मैत्रिणीला गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला, त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

2) तुमच्या मित्राला किंवा मैत्रिणीला पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला, त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**********************

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/